मागासवर्गीयांना पदोन्नतीमध्ये आरक्षण रद्द करण्याबाबत मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका (SLP) दाखल करण्याच्या अनुषंगाने पुढील कायदेशीर प्रक्रिया राबविण्याकरिता मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली सनियंत्रण व आढावा समिती गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्र. बी.सी. सी.२०१७/प्र.क्र.३६६ अे/१६-ब

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : २१ सप्टेंबर, २०१७.

वाचा:- सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय:- बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६-ब, दि. २५ मे २००४

प्रस्तावना :

मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. २७९७/२०१५ , महाराष्ट्र राज्य विरुद्ध श्री. विजय घोगरे व इतर प्रकरणी दि. ४ ऑगस्ट, २०१७ रोजी **"मागासवर्गीयांना पदोन्नतीमध्ये आरक्षण रद्द करण्याबाबत"** दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने पुढील कायदेशीर प्रक्रिया राबविण्याकरिता व मा.सर्वोच्च न्यायालयात विहित मुदतीत विशेष अनुज्ञा याचिका (SLP) दाखल करुन सर्वोच्च न्यायालयात शासनाची बाजू सक्षम व प्रभावीपणे मांडण्याकरिता विशेष विधिज्ञ व तज्ञ कायदेशीर सल्लागाराची नेमणूक करणे व सर्वोच्च न्यायालयात सादर करण्याकरीता संख्यात्मक आकडेवारी (Quantified Data) तयार करणे व मागासवर्गीयांना पदोन्नतीमध्ये प्रत्येक स्तरावर आरक्षण देण्याबाबतचा कायदा कायम राहण्याकरिता सर्व आवश्यक माहिती व कागदपत्रांची पूर्तता करणे संदर्भात व पुढील कायदेशीर प्रक्रिया राबविण्याकरिता मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली सनियंत्रण व आढावा समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

मा. उच्च न्यायालयाने रिट पिटीशन २७९७/२०१५ , महाराष्ट्र राज्य व इतर विरुद्ध श्री. विजय घोगरे व इतर प्रकरणी दि. ४ ऑगस्ट, २०१७ रोजी **"मागासवर्गीयांना पदोन्नतीमध्ये आरक्षण रद्द करण्याबाबत"** दिलेल्या मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने पुढील कायदेशीर प्रक्रिया राबविण्याकरिता मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली सनियंत्रण व आढावा समितीची स्थापना करण्यात येत आहे. सदर समितीची रचना पुढीलप्रमाणे राहील :-

अ.क्र.	सदस्य	पद
१	मुख्य सचिव , महाराष्ट्र राज्य	अध्यक्ष
२	प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग , मंत्रालय , मुंबई.	सदस्य
३	सचिव , सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग , मंत्रालय , मुंबई.	सदस्य
४	सचिव, आदिवासी विकास विभाग मंत्रालय , मुंबई.	सदस्य
५	सचिव, वि.जा.भ. ज. व इमाव, विमाप्र कल्याण विभाग मंत्रालय, मुंबई.	सदस्य
६	सचिव ,(साविस) सा. प्र. वि , कार्यासन १६ -ब, मंत्रालय , मुंबई.	सदस्य
७	राज्य मागास वर्ग आयोग , यांचे प्रतिनिधी	सदस्य
८	महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.	सदस्य
९	आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.	सदस्य
१०	सह सचिव , मावक , सामाजिक न्याय व विशेष विभाग , मंत्रालय , मुंबई.	सचिव
११	उप सचिव , सामान्य प्रशासन विभाग (१६-ब) , मंत्रालय , मुंबई.	सदस्य सचिव

सदर समितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहील :-

१. उपरोक्त समिती मागासवर्गीयांचे पदोन्नत्तीतील आरक्षण रद्द करण्याच्या मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या निर्णयाविरुद्ध मा.सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यासाठी करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचे सनियंत्रण करणे.

२. मा.सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याबाबत करण्यात येणाऱ्या कार्यवाही संबधात मार्गदर्शन करणे.

३. विशेष विधिज्ञ यांची नेमणूक करणे तसेच व इतर माहितीगारांशी विचारविनियम करणे.

४. समिती मार्फत सदर प्रकरणाचा प्रगतीचा वेळोवेळी आढावा घेणे.

५. सर्व संबधित अधिकाऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन व निर्देश देणे.

६. सदर प्रकरणी सद्यस्थिती अहवाल अवलोकनार्थ सादर करणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९२११६२५४४१२०७ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Tikaram Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c08328de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2017.09.21 16:16:06 +05'30'

(टि. वा. करपते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव,

२) मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३) मा. मुख्य सचिव , महाराष्ट्र राज्य
४) मा. मंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव,
५) मा. राज्यमंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव,
६) विरोधी पक्षनेते, विधानसभा, विधान भवन, मुंबई
७) विरोधी पक्षनेते, विधान परिषद, विधान भवन मुंबई
८) सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई
९) सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय,मुंबई
१०) सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई
११) सचिव, वि.जा.भ. ज. व ईमाव, विमाप्र कल्याण विभाग मंत्रालय, मुंबई
१२) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
१३) महासंचालक, बार्टी, पुणे
१४) उपसचिव १६ ब सामान्य प्रशासन विभाग , मंत्रालय, मुंबई .
१५) सह सचिव मावक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
१६) निवड नस्ती (सा.प्र.वि- १६ ब).